रे. दिवाणी मुकदमा क्र. १६३/२०१९ मधील निशाणी क्र. १९ वरील आदेश

(राजाक्का कणसे वि दत्तात्रय नलवडे)

(CNR No. MHSN130006772019)

१. वादी क्र. १ व २ यांनी सदरचा दावा हा प्रवादी क्र. १ ते ९ यांचेविरुध्द सरसनिरसस मानाने वाटप होवून अलग व पृथक कब्जा मिळणेसाठी व डिक्लेरेशनसाठी दाखल केला आहे व त्याअंतर्गत सदरचा अर्ज हा तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी केलेला आहे.

२. वादी यांची केस थोडक्यात पुढीलप्रमाणे -

वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन दावेचे कलम १अ मध्ये नमूद केलेले आहे. तर वंशावळ कलम २ मध्ये नमूद केलेली आहे. वादी क्र. १ ही वादी क्र. २ यांची नात्याने मुलगी असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे शंकर नाना नलवडे यांनी रेदिमुक्र १८२/२०१८ हा न्यायालयामध्ये वाटपासाठी दाखल केला. तो तडजोडीने १७/०३/२०१९ रोजी निकाली झालेला आहे. त्या दाव्यातील तडजोड ही वादी क्र. १ यांचे वडील व वादी क्र.२ यांचे पती हणमंत यांचेसोबत तडजोड करुन तो जाणीवपूर्वकरीत्या असा निकाली केला की त्यामुळे वादी क्र. १ व २ यांना वाटप मिळू नये या कारणास्तव तो निकाली केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र. १० व ११ यांना त्या दावेचे कामी पार्टी केलेले नव्हते. त्यामुळे त्यामधील हुकूमनामा बेकायदेशीर आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र. ६ हे व्यसनाधिन असून परस्त्रीशी असणा-या संबंधातून प्रवादी यांचेशी संगनमत करुन व प्रवादी क्र. १ ते ९ यांना

हाताशी धरुन तडजोड अस्तीत्वात आणली. प्रवादी क्र. ६ याच्या हिश्याला जे क्षेत्र देणेत आले ते अत्यंत अल्प असून सर्व चांगल्या जमिनी या इतर प्रवादी व वादी यांच्या हिश्याला देण्यात आल्या. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे रेदिमुक्र १८२/२०१८ मध्ये जी तडजोड झाली ती सरसनिरस मानाने करणेत आलेली नाही. त्यामुळे ती रदद होणेकामी त्यांनी सदरचा दावा केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा हिस्सा डावलणेसाठी तडजोड अस्तीत्वात आणलेली असलेने सदरचा दावा निकाली होईस्तोपर्यंत दावा मिळकतीची विक्री होवू नये या कारणास्तव तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणेविषयी त्यांनी विनंती केलेली आहे.

३. प्रवादी यांना समन्स प्राप्त झालेवर नि.२८ वर आपली कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे रेदिमुक्र १८२/२०१८ हा कायदेशीररीत्या निकाली झालेला असून त्याप्रमाणे त्या दाव्यातील वादी व प्रवादी यांचे दरम्यान वाटप कायम झालेले आहे. वादी यांनी दावा मिळकतींची तबदिली होवू नये किंवा त्यावर बोजा चढवू नये म्हणून तुर्तातुर्त मनाई अर्ज सादर केलेला आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे ते स्वतः वयोवृध्द असून वाटपानंतर त्यांच्या हिश्याला आलेली मिळकत ते वहिवाटत आहेत. प्रवादी क्र.६ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. वैदयकीय कारणास्तव किंवा इतर खर्चासाठी त्यांना पैशाची आवश्यकता पडलेस वाटपातल्या मिळकती व्यतिरिक्त अन्य त्यांच्याकडे कोणतीही मिळकत नाही त्यामुळे वादींचा अर्ज रदद करणेविषयी त्यांनी विनंती केली. प्रवादी यांच्या

म्हणण्याप्रमाणे वयोमानाप्रमाणे त्यांना शेती होत नसून त्यांनी वाटपादरम्यान जी जमीन स्वतःच्या हिश्यास घेतली आहे ती कशाप्रकारे योग्य आहे ही गोष्ट पुरावा प्राप्त झालेवर स्पष्ट होवू शकते. परंतू दरम्यानचे कालावधीमध्ये मनाई आदेश दिला गेलेस दावा मिळकतीचे व त्यांचे नुकसान संभवते. त्यामुळे त्यांनी वादींचा अर्ज रदद करणेविषयी विनंती केलेली आहे.

४. वादीतर्फे श्री. एम. आर. इनामदार, वकील व प्रवादी यांचेतर्फे श्री. राजे भोसले, वकील यांचा युक्तीवाद ऐकलेवर या अर्जाचे कामी पुढीलप्रमाणे गुण काढणेत येतात.

| अ.क्र. | गुण | उत्तर |
|---|---|---|
| १ | वादी यांना तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही |
| २ | परिस्थितीचा समतोल हा कोणाच्या बाजुने आहे. | प्रवादी क्र.६ यांचे बाजूने आहे. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई आदेशाअभावी दावा मिळकतीचे नुकसान होवु शकते काय ? | नाही |
| ४ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>गुण क्रमांक १</u>**

५. वादी यांनी त्यांची बाजू मांडणेसाठी नि.३ च्या यादीसोबत गट क्र. ४५२

तसेच गट क्र. ६५७, ७, ७९१, ८४७/२, ८४७/१/अ, ५०६, ८५० या जमिनींचे सातबाराचे उतारे दाखल केलेले आहेत तर रेदिमुक्र १८२/२०१८ मधील हुकूमनामेची प्रत दाखल केलेली आहे. वादी यांच्या विद्वान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की तडजोडीद्वारे जो हुकूमनामा अस्तीत्वात आणणेत आला त्याप्रमाणे हणमंत आण्णा नलवडे यांना गट क्र.४५२ मध्ये व गट क्र.६५७ तसेच गट क्र.७, गट क्र. ७९१, ८४७/२ या जमिनीमध्ये हिस्सा देणेत आलेला आहे. परंतू ते क्षेत्र जर पाहिले तर ते अत्यंत अल्प असून वादी यांना एकत्र कुटुंबाच्या मिळकतीपैकी त्यांच्या वडिलांच्या हिश्याचे क्षेत्र मिळू शकणर नाही. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री राजेभोसले यांनी युक्तीवाद सादर केला की जे वाटप करणेत आलेले होते ते प्रवादी क्र. ६ व त्यांच्या भावादरम्यान झालेले आहे. त्या वाटपामध्ये वादी क्र.१ व २ किंवा प्रवादी क्र. १० व ११ यांना कोणत्याही प्रकारे अधिकार प्राप्त होत नसलेने त्यांना पार्टी करणे आवश्यक नव्हते. प्रवादी यांचेवतीने पुढे युक्तीवाद सादर करणेत आला की प्रवादी यांनी जे वाटप सर्वांसमवेत करुन घेतलेले आहे ते कायदेशीर पध्दतीने केलेले असून ते त्यांच्या सोईप्रमाणे स्वतःचा आर्थिक फायदा पाहूनच त्यांनी केलेले आहे. त्यामुळे वादी यांना त्याच्याबददल वाद उपस्थित करणेचे काहीही कारण उदभवत नाही. प्रवादी यांचे विद्वान वकीलांनी युक्तीवादात पुढे म्हटले आहे की वादी कित्येक वर्षापासून प्रवादी क्र.६ पासून वेगळे रहात आहेत. त्यामुळे एकत्र कुटुंबामध्ये कशाप्रकारे वाटप करणेत आले याची कल्पना त्यांना नाही. प्रवादी क्र. ६ यांच्या हिश्यामध्येच वादींना हिस्सा प्राप्त होवू शकतो

त्यामुळे ते रेदिमुक्र १८२/२०१८ मधील वाटपाविषयी वाद उपस्थित करु शकत नाहीत.

६. वादी व प्रवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकलेवर रेदिमुक्र १८२/२०१८ मध्ये ज्यावेळी वाटप झाले त्यावेळी वादी क्र. १ व २ व प्रवादी क्र. १० व ११ यांना कोपार्सनर म्हणून वाटप मागणेचा हक्क नव्हता. त्यावेळी ते जे वाटप होते ते प्रवादी क्र. १ ते ९ यांच्या दरम्यान अस्तीत्वात आलेले आहे. प्रवादी क्र. ६ यानेपण ते वाटप चुकीच्या पध्दतीने केले असे तो स्वतः कुठेही म्हणत नाही किंवा कोणत्याहीप्रकारे त्याची फसवणुक झाली असे तो म्हणत नाही. जे वाटप नोंदविणेत आले ते तडजोडीने न्यायालयामध्ये नोंदवणेत आलेले असून शारीरिकरीत्या व मानसिकरीत्या तो जाणता आहे की नाही याची पडताळणी झालेवर ते नोंदवले असलेचा तर्क प्राप्त होतो. वादी म्हणतात त्याप्रमाणे प्रवादी क्र. ६ याच्याबाबत कोणताही अन्याय झाला आहे असा तर्क प्राप्त होत नाही. प्रवादी क्र.६ याला वादी क्र. २ ही पत्नी असून वादी क्र.१ ही मुलगी आहे. तर प्रवादी क्र. १० व ११ हे प्रवादी क्र. ६ च्या मयत मुलीचा मुलगा व पती आहेत. वास्तवामध्ये प्रवादी क्र. ११ हे या दावेचे कामी आवश्यक पार्टी नाहीत कारण त्यांना कोणत्याहीप्रकारे पत्नीच्या वडिलार्जित मिळकतीमध्ये हिस्सा प्राप्त होवू शकत नाही. वादी १ व २ व प्रवादी क्र. १० यांना जो वाटप मागणेचा हक्क प्राप्त होतो तो फक्त प्रवादी क्र.६ यांच्या हिश्याच्या मिळकतीमध्ये प्राप्त होतो. त्यामुळे त्याच्या हिश्याला आलेल्या मिळकतीविषयी ते सध्या वाद उपस्थित करु शकत नाहीत. त्यामुळे वादी यांना

तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी प्रथमदर्शनी केस नसलेचा तर्क प्राप्त होतो. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

**<u>गुण क्रमांक २</u>**

७. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे जे वाटप यापूर्वी नोंदवणेत आलेले आहे ते वादी १ व २ व प्रवादी क्र. १० व ११ वर अन्याय करणारे आहे. कारण गट क्र. ६५७ व ५०६ या मिळकती कडेगांव येथील बारापटटा म्हणून ओळखल्या जाणा–या सुपीक भागातील असून त्यांची बाजारभावाप्रमाणे किंमत जास्त आहे. त्या मिळकतीमध्ये प्रवादी क्र. ६ यांना हिस्सा देणेत आलेला नाही. तर गेस्ट हाऊस लगत असणारा गट क्र. ८४८ब याची किंमत देखील बाजारभावाप्रमाणे जास्त असून त्यामध्येही त्यांना हिस्सा देणेत आलेला नाही. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे कडेपूर रस्त्यालगत गेस्ट हाऊसच्या मागे गट क्र. ८५० व ७५१ यामध्ये प्रवादी क्र.६ यांना काहीही क्षेत्र देणेत आलेले नाही. त्यामुळे साहजिकच प्रवादी क्र.६ च्या शाखेमध्ये जेव्हा वाटप होईल त्यावेळी त्यांना काहीच फायदा त्यापासून प्राप्त होणार नाही असे वादी यांचे विद्वान वकीलांनी नमूद केलेले आहे. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. राजेभोसले यांनी युक्तीवाद सादर केला की दावा मिळकतींच्या बाजारभाव व किंमती काय आहेत हे पुरावा प्राप्त झालेवर स्पष्ट होवू शकते. आता ज्या मिळकती प्रवादी क्र. ६ याच्या हिश्याला देणेत आलेल्या आहेत त्या प्रवादी क्र. ६ यांचे सांगणेवरुनच देणेत आलेल्या आहेत. प्रवादी क्र. ६ हे स्वतः वयोवृध्द असून शेती व्यवसाय करणे त्यांना अशक्य आहे. वादी १ व २ हे ब–याच वर्षापासून

त्यांच्यापासून विभक्त रहात असून त्यांची देखभाल करणारे कुणीही नसलेने आवश्यक असणारे औषध उपचार मिळवणेसाठी वेळप्रसंगी त्यांना मिळकतीपासून आर्थिक सहाय्य मिळू शकते. प्रवादी यांना मनाईद्वारे जर हरकत केली गेली तर त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध होवू शकणार नाही. त्यामुळे प्रवादी क्र. ६ यांचे जे नुकसान होईल त्याची गणना पैशाच्या स्वरुपात करता येवू शकत नाही. वादी हिचा एकत्र कुटुंबाशी असणारा संबंध हा प्रवादी क्र. ६ यांचेमुळेच आहे. त्याच्यापाशी त्याच्या हिश्याची जी मिळकत आहे तीच भविष्यात वादीला वाटून मिळू शकते. सध्या प्रवादी क्र. ६ हे एकटेच रहात असून स्वतःच्या देखभालीसाठी व पालनपोषणासाठी त्यांना मिळकतीपासून सहाय्य प्राप्त होत असलेचा तर्क प्राप्त होतो. अशा परिस्थितीत त्याना हरकत केली गेली तर त्यांचे व दावा मिळकतीचे नुकसान संभवते. त्यामुळे परिस्थितीचा समतोल हा प्रवादी क्र. ६ यांचे बाजूने आहे.

**<u>गुण क्रमांक ३</u>**

८. वादी याचे विद्वान वकील श्री. इनामदार यांनी युक्तीवाद सादर केला की प्रवादी यांनी त्यांच्या सोईप्रमाणे मिळकतीचे वाटप केलेले आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी हे नजीकच्या काळामध्ये दावा मिळकती हस्तांतरीत करु शकतात. वादी यांनाही दावा मिळकतीमध्ये हिस्सा असून त्यांचा हिस्सा वाटून न मिळालेस त्यांचे मोठे नुकसान संभवते. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. राजेभोसले यांच्या म्हणण्याप्रमाणे रेदिमुक्र १८२/२०१८ मधील वाटप होताना कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य किंवा

फसवणुक झाली असलेचे हुकूमनामेवरुन दिसून येत नाही. प्रवादी क्र. ६ यांच्या हक्कात जे वाटप झाले त्या मिळकती व्यतिरिक्त वादी व प्रवादी क्र. ९ यांना अन्य मिळकतीमध्ये हिस्सा प्राप्त होवू शकत नाही. अशा परिस्थितीमध्ये सर्व मिळकतींविषयी मनाई आदेश दिला गेला तर निश्चितच प्रवादी यांना जमीन वहिवाटणे किंवा आर्थिक व्यवहार करणे अशक्य ठरु शकते.

९. वादी यांना जो हिस्सा उपलब्ध आहे तो प्रवादी क्र.६ यांच्या हिश्यापैकी असून तो त्यांच्या दरम्यान जेव्हा वाटप होईल त्यावेळी प्राप्त होवू शकतो. प्रवादी क्र. १ ते ५ व ६ ते ८ यांनी कोणत्याही गैरप्रकारे स्वतःच्या कब्जामध्ये हिस्सा घेतला आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे मनाई आदेश दिला गेला तर निश्चितच दावा मिळकतीचे नुकसान होवू शकते. त्यामुळे गुण क्रमांक ३ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

१०. वादी यांनी सदरचा अर्ज तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादी यांना तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी प्रथमदर्शनी केस नसलेने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

## आदेश

१. वादींचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह रदद करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2019.11.19 13:42:07 +05'30'

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – १८/११/२०१९ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 18/11/2019 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 19/11/2019 |
| Order uploaded on | : 19/11/2019 |